# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 07/11/2022 (सोमवार) सकाळ

---

## घरफोडी

**पो.स्टे. कन्हान** :— अंतर्गत ०२ कि. मी. अंतरावरील संजीवनी नगर, कांद्री कन्हान पारशिवनी येथे फिर्यादी नामे—विष्णु सुन्नर खेळे, वय ४७ वर्ष, रा. संजिवनी नगर, कांदी कन्हान ता. पारशिवनी यांच्या आईचे निधन झाल्याने ते कन्हान येथुन आईचे निधन कार्यक्रमाकरीता किरनापुर या गावी दिनांक ०३/११/२०२२ रोजी रवाना झाले होते दिनांक ०६/११/२०२२ रोजी सोनु थोरात या मुलीने फोन वरून माहिती दिली की, त्यांच्या घराचा ताला तुटलेला आहे. अशी माहिती मिळताच घरी परत आले असता, घरी परत येवून बघीतले असता कोणीतरी अज्ञात चोराने घरातुन नगदी १२०००/— रू. चोरी चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कन्हान येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५४, ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपींचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस स्टेशन कन्हान करीत आहे.

## अवैध रेती चोरी करणाऱ्या आरोपीला अटक

**पो.स्टे. सावनेर** :— अंतर्गत १० कि. मी. अंतरावरील सावनेर नागपुर रोड, वेलतुर फाटा येथे ०६/११/२०२२ चे ०८.०० वा. ते ०८.४० वा. सुमारास फिर्यादी नामे— सरकारतर्फे पोलीस हवालदार योगेश झोडापे, ब. नं ५५८ पोलीस स्टेशन सावनेर व पोलीस स्टेशन सावनेरचे पोलीस पथक पेट्रोलिंग डयुटी करीत असतांना, मुखबिरव्दारे माहिती मिळाली की, पोलीस स्टेशन वेलतुर वरुन पाटणसावंगीकडे जाणाऱ्या लाल रंगाच्या ट्रॅक्टरमध्ये अवैध्यरित्या विनापरवाना गौण खनिजची, रेतीची चोरटी वाहतुक होत आहे, अशा मिळालेल्या माहितीवरुन एक लाल रंगाची ट्रॅक्टर क्र. एम. एच. —४०/एल—४२६९ ट्रॉलीची पाहणी केली असता, त्यामध्ये एक ब्रॉस रेती किमती अंदाजे ५०००/— रु., विना रॉयल्टीची व आरोपीकडे कोणताही शासकीय परवाना नसल्याने ट्रॅक्टर क्र. एम.एच.—४०/एल—४२६९ चा विना नंबरची ट्रॉली किमती अंदाजे ४५,००००/— एकुण किमती अंदाजे ४,५५,०००/—रुपयाचा मुद्देमाल आरोपी नामे— सलिम करीम शेख, वय ४३ वर्ष, रा. वार्ड क्र. ०१, गणेश मंदिर जवळ, पाटणसावंगी याचेकडून ताब्यात घेतला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलिस स्टेशन सावनेर करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**